ARÖGYADARPAN
Punekar's health now a click away
॥ आरोग्यम् धनसंपदा ॥



**Dr. Akshara Inamdar**
**B. D. S.**
**Phone :** (020) 25674502, 9822279597
**Email ID:** akshara_gadgil@yahoo.com

# <u>दातांसाठीची ज्वेलरी</u>

प्रथम दर्शनी एखादी व्यक्ती आपल्या नजरेत भरते ती तिच्या प्रसन्न हास्यामुळे.आपले हास्य सुंदर भासावे असे प्रत्येकालाच वाटत असते. सध्याच्या आधुनिक काळात आपलं हास्य अधिक आकर्षक (मनमोहक) बनविण्यासाठी खास दातांसाठी उपलब्ध असलेल्या ज्वेलरीचा (Tooth Jwellery) वापर करता येऊ शकतो. या ज्वेलरीमध्ये विविध आकाराच्या व विविध रंगाच्या स्फटिकांचा (crystals), गोल्ड चिप्सचा, स्वरोव्हस्की क्रिस्टल (Swarovaski Crystals) इत्यादीचा समावेश होतो.

या प्रकारची ज्वेलरी दातांवर लावण्यासाठीची उपचारपद्धती खूप साधी आहे. साधारणतः १० ते २० मिनिटांत हे स्फटिक पुढच्या दातांच्या बाह्य आवरणावर लावले जातात.कुठल्याही प्रकारचा छेद न देता केली जाणारी (बिनटाक्याची) ही उपचारपद्धती वेदनाविरहीत असते. दाताच्या वरच्या आवरणावर (Enamel) 'टूथ अधेसिव्ह' (Tooth Adhesive) च्या सहाय्याने हे स्फटिक दातावर चिकटवले जातात.हे स्फटिक अतिशय सूक्ष्म असले तरी हाताळण्यास सोपे अशा स्वरुपाचे असतात.या स्फटिकांच्या वापरामुळे (आवरणामुळे) हास्य अधिक आकर्षक होऊ शकते.(हास्य अधिक प्रसन्न वाटते) दातांवर एकदा लावलेले हे स्फटिक दाताला इजा न होऊ देता सहजरीत्या काढले जाऊ शकतात.एकदा वापरलेले स्फटिक पुन्हा वापरता येत नाहीत.हे स्फटिक टोकदार नसल्यामुळे ओठांना इजा होण्याचा धोका नसतो.(ओठांना इजा होत नाही) नियमितपणे दात घासून गुळण्या करुन दातांची तसेच दातांसाठीच्या ज्वेलरीची नीट काळजी घेतली जाऊ शकते.

सध्याच्या काळात व्यक्तीला स्वतःची स्वतः लावता येईल अशी ज्वेलरीची कीट देखील उपलब्ध आहे.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*